ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 28 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इराणचा नवा प्रस्ताव, युद्ध थांबवल्यास होर्मुझची सामुद्रधुनी खुली





पान 3 वरुन...

भामा-आसखेड जलप्रकल्पात विलंब

### संवेदनशील गटांनी विशेष काळजी घ्यावी; आयएमडीचा इशारा

# देशासह महाराष्ट्रात उष्णतेचा कहर; हवामान विभागाच्या कडक सूचना

**महाईन्यूज । मुंबई**

**येत्या काही दिवसांत जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंडीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान; तसेच मध्य भारतातील तुरळक भागांत उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. किनारपट्टी आणि पूर्वेकडील भागात उष्ण व दमट हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला असून, उत्तर भारताच्या काही भागांत रात्रीही उकाडा जाणवू शकतो. '२७ एप्रिलपर्यंत वायव्य भारतातील कमाल तापमानात कोणताही लक्षणीय बदल होणार नाही.**

त्यानंतर तापमानात हळूहळू घट होईल; तर मध्य आणि इतर भागांत अंदाजाच्या कालावधीत तापमानात टप्प्याटप्प्याने वाढ आणि त्यानंतर घट होण्याची शक्यता आहे,' असेही यांनी सांगितले.





महाराष्ट्रातही दिवसेंदिवस उष्णतेचे चटके तीव्र होत आहेत. खान्देशचा पारा गेल्या काही दिवसांपासून ४१ ते ४३ अंशांदरम्यान रेंगाळत आहे. जळगावचे तापमान ४३.४, नंदुरबार ४१; तर अहिल्यानगरचा पारा ४० अंशावर गेला. राज्यात शनिवारी उच्चांकी ४५.६ अंश सेल्सिअस तापमान अकोल्यात आणि सर्वांत कमी किमान तापमान २१.६ अंश सेल्सिअस महाबळेश्वरमध्ये नोंदविण्यात आले. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पारा ४० ते ४५ अंशांच्या पुढेच नोंदवला गेल्याने यंदा राज्यभरात उष्णतेची तीव्र लाट जाणवत आहे.

नाशिकमध्ये शनिवारी तापमानाचा पारा थेट ४१ अंशांवर गेला. शुक्रवारी कमाल तापमान ३९.६ अंश सेल्सिअस नोंदविले गेले होते. त्यामध्ये चोवीस तासांत सुमारे दोन अंश सेल्सिअसची वाढ होऊन ते ४१.५ अंश सेल्सिअसवर पोहोचले. या हंगामातील हे उच्चांकी तापमान ठरले आहे. मालेगावला ४३.४, जळगावला ४३.३, तर छत्रपती संभाजीनगरला ४१.८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात शनिवारी किमान तापमानही २२.३ अंश सेल्सियस नोंदविण्यात आले आहे.



## खान्देशात साठ्यात घट

जळगाव : खान्देशात सध्या उन्हाचा तडाखा वाढून तापमानाचा पारा ४१ ते ४३ अंशांच्या दरम्यान स्थिरावला आहे. उष्णतेमुळे जलप्रकल्पांमधील पातळीतही वेगाने घट होऊ लागली आहे. जळगाव जिल्ह्यातील लहान-मोठ्या प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ४७.३६ टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक असून, पावसाळा सुरू होईपर्यंत पुढील तीन ते साडेतीन महिने पाण्याचे नियोजन करणे प्रशासनासाठी मोठी कसोटी ठरणार आहे.

## मार्गदर्शक सूचना

नवी दिल्ली : देशात अनेक भागांत तापमानाचा पारा वाढत असताना भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) उष्णतेच्या लाटांबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचना प्रसृत केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. थेट सूर्यप्रकाशात, विशेषतः दुपारच्या वेळी जास्त वेळ राहणे टाळा, पुरेसे पाणी प्या, हलके आणि सैल कपडे घाला आणि अधिक तापमानाच्या काळात बाहेर मेहनतीच्या गोष्टी टाळा अशा सूचना करण्यात आल्या आहेत. प्रतिबंधात्मक उपाय अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे विभागाने स्पष्ट केले. भारतीय हवामान विभागाने मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्ती यांसारख्या संवेदनशील गटांसाठी विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# अमली पदार्थ तस्करांविरुद्ध विशेष मोहीम

## ५८ लाखांचे अमली पदार्थ जप्त; विशेष पथकाकडून १९ जण अटकेत

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे पोलिसांच्या परिमंडळ सात परिसरात अमली पदार्थांची विक्री, तसेच तस्करी करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आले. पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत मेफेड्रोन, गांजा, अमली पदार्थांची भुकटी असा ५८ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी विमाननगर, चंदननगर, खराडी, वाघोली, लोणीकंद, लोहगाव भागात १३ कारवाया केल्या. या कारवाईत १९ जणांना अटक करण्यात आली.**




त्रिस्तन प्रफुल्ल कुलकर्णी (वय ३०, रा. वडगाव शेरी), उबेद अन्सार खान (वय २५, रा. सय्यदनगर रेल्वे फाटकाजवळ, हडपसर), व्यंकटेश गंगाप्पा चव्हाण (वय १९, रा. वडगाव शेरी), सार्थक बलराज खंडाळे (वय १९, रा. वडगाव शेरी), अमित उपदेश यादव (वय २३, रा. वडगाव शेरी), सुमीत संजय लांडगे (वय २५, रा. रामवाडी, येरवडा), प्रवीण पूनमचंद बिझोई (वय २२, रा. गोकुळनगर, कात्रज-कोंढवा रस्ता), योगेश सुभाष कणसे (वय २८, रा. लोणीकंद, अहिल्यानगर रस्ता), नीलेश सदाशिव भोसले (वय ३६, रा. भोसले वस्ती, वाघोली), मनविंदर शंकर सिंग (वय ४२, रा. टिंगरेनगर), रमेश उदाराम सुतार (वय ३४, रा. योजनानगर, लोणीकंद, अहिल्यानगर), पुंजाजी जयवंत चौधरी (वय ४०, रा. जय मल्हार सोसायटी, वाघोली), भगीरथ सजनसिंग पुरोहित (नय २८, रा. मांजरी), आदिनाथ दशरथ शिंदे (वय २९, रा. मांजरी), योगेश लक्ष्मण चव्हाण (रा. शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा), राजेंद्र केरु टेळे (वय ३५, रा. चाकण-शिक्रापूर रस्ता, ता. शिरुर), करण सचिन मोहिते (वय २१, रा. सणसवाडी, अहिल्यानगर रस्ता), शबनम हनीफ शेख (वय ३१, रा. भुकन वस्ती, लोहगाव) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहे.

'आरोपींकडून मेफेड्रोन जप्त करण्यात आले असून, त्यांनी राजस्थानातून मेफेड्रोन आणल्याची माहिती तपासात दिली, तपासात आरोपींनी त्यांच्या साथीदारांची नावे सांगितले. राजस्थानातून विशेष पथकाने सहाजणांना अटक केली', अशी माहिती परिमंडळ सातचे पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

> “ अमली पदार्थ विक्रीचे प्रकार दिसल्यास त्वरीत पोलिसांना माहिती द्यावी. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.
>
> **- सोमय मुंडे, पोलीस उपायुक्त.**

विशेष मोहिमेत पोलिसांनी अमली पदार्थ विक्री प्रकरणात १९ जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून मेफेड्रोन, गांजा, मेफेड्रोनचा अंश असलेली भुकटी असे ५८ लाख १८ हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# पुरंदर विमानतळाला मोठी चालना; ₹6,000 कोटी कर्जाला राज्य सरकारची हमी

**महाईन्यूज । पुणे**

**पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाबाबत एक अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादनाला मोठी चालना देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या विमानतळाच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला 6,000 कोटी रुपयांच्या कर्जाची हमी देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.**



पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) 6,000 कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यासाठी राज्य सरकारने अधिकृतपणे शासन हमी दिली आहे. या निर्णयामुळे कागदावरच असलेला हा प्रकल्प आता प्रत्यक्ष कृती आराखड्यात येण्याची चिन्हे आहेत.

फेब्रुवारी महिन्यात पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या कर्जप्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे उद्योग विभागाचा 27 फेब्रुवारीचा जुना निर्णय रद्द करून आता वित्त विभागाने सुधारित शासन निर्णय जारी केला आहे. या कर्जहमीची मुदत 12 महिन्यांची असेल. एमआयडीसी आता हुडको (कणऊउज) किंवा इतर नामांकित वित्तीय संस्थांकडून स्पर्धात्मक व्याजदराने हे कर्ज घेऊ शकणार आहे.

### शेतकऱ्यांचा मोबदला अन् पुनर्वसनासाठी वापर

प्रशासकीय स्तरावर या प्रक्रियेला वेग देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुरंदर विमानतळासाठी सुमारे 2,800 ते 3,000 हेक्टर जमिनीचे संपादन होणे अपेक्षित आहे. जमिनीच्या बदल्यात शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि पुनर्वसनासाठी या निधीचा वापर केला जाणार आहे. लोहगाव विमानतळाची मर्यादित क्षमता पाहता पुण्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासाठी पुरंदर विमानतळ अत्यंत कळीचा मुद्दा मानला जात आहे.

### महत्त्वाचे मुद्दे

- **6 हजार कोटी कर्जाला हमी**
  महाराष्ट्र शासनाने भूसंपादनासाठी सुमारे 6 हजार कोटी रुपयांच्या कर्जाला हमी दिली आहे. या निर्णयामुळे पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी निधी उभारणी सुलभ होणार असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला प्रत्यक्ष गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
- **भूसंपादन प्रक्रियेला वेग**
  प्रस्तावित विमानतळासाठी तीन हजार एकर जमीन संपादित केली जाणार आहे. शासनाच्या हमीमुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रशासनाने ही प्रक्रिया पारदर्शक आणि जलदगतीने पूर्ण करण्याचे संकेत दिले आहेत, ज्यामुळे प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांना चालना मिळेल.
- **पुण्याच्या विकासाला चालना**
  लोहगाव विमानतळावरील वाढता ताण कमी करण्यासाठी पुरंदर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे जिल्ह्यासह परिसरातील औद्योगिक, आयटी आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल तसेच रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.



# भामा-आसखेड जलप्रकल्पात विलंब; ठेकेदार बडतर्फ, 84 कोटींची नवी निविदा

## उर्वरित 30% कामासाठी दोन ठेकेदार; 9 महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने भामा-आसखेड धरणातून 167 पाणी आणण्यासाठी भूमिगत जलवाहिनीसह इतर कामे करण्यात येत आहेत. वारंवार मुदतवाढ देऊनही जलवाहिनीच्या कामास विलंब केल्याने संबंधित ठेकेदार बडतर्फ केला असून, उर्वरित 30 टक्के कामासाठी निविदा काढण्यात आली आहे. त्या कामाची मुदत 9 महिने असून, त्यासाठी दोन वेगवेगळे ठेकेदार नेमले जाणार आहेत. त्या कामासाठी बडतर्फ ठेकेदाराला संधी देण्यात येणार नाही, असे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.**




खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून शहरासाठी 167 एमएलडी पाणी भूमिगत जलवाहिनीद्वारे चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणण्यात येणार आहे. वारंवार मुदतवाढ आणि सक्त सूचना देऊनही मुंबई येथील ऑफशेर इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेड या ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही. अद्याप



30 टक्के काम शिल्लक आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने संबंधित ठेकेदाराला बडतर्फ करून नव्याने अल्प मुदतीची निविदा काढण्यात आली आहे.

निविदा 10 एप्रिलला प्रसिद्ध करण्यात आली आहे. भामा आसखेड धरणापासून नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर ट्रॅंकपर्यंत 1700 मिलीमीटर व्यासाची भूमिगत जलवाहिनी टाकण्याचे उर्वरित काम करण्यासाठी 33 कोटी 35 लाख रुपये खर्चाची निविदा आहे.

तर, ब्रेक प्रेशर ट्रॅंकपासून तळवडे व देहूपर्यंतच्या 1400 मिलिमीटर जलवाहिनीचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी 50 कोटी 69 लाख रुपये खर्चाची निविदा आहे. अशी एकूण 84 कोटी 4 लाख रुपये खर्चाची ही निविदा आहे. ही दोन्ही कामे वेगवेगळ्या दोन ठेकेदारांना देण्यात येणार आहेत. काम पूर्ण करण्यासाठी 9 महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

### दोन कामांसाठी दोन स्वतंत्र ठेकेदार

उर्वरित कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यासाठी 7 दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याला 5 ठेकेदारांनी प्रतिसाद दिला आहे. दोन कामासाठी स्वतंत्र दोन ठेकेदार नेमण्यात येणार आहेत. पावसाळा धरून कामाची मुदत 9 महिने आहे. लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्याचे नियोजन आहे. बडतर्फ केलेल्या ठेकेदाराला निविदा प्रक्रियेत समावेश करण्यात आलेला नाही, असे महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये तापमान 41 अंशांवर; उष्णतेने नागरिक हैराण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात सलग दुसऱ्या दिवशी पारा उसळलेलाच होता. शहराचे तापमान रविवार (दि. 26) 41 अंश इतके नोंदविले गेले. रविवार सुट्टीचा दिवस असूनही तापमानाच्या चढत्या पाऱ्यामुळे रस्त्यावरील वर्दळ कमी होती.**



एकंदर वाढत्या तापमानाने शहरवासीयांना घाम फुटत आहे. उन्हामुळे त्वचेची व डोळ्यांची जळजळ, डोकेदुखी, चक्कर येण्याचे प्रमाण वाढले आहे. थोडावेळ उन्हात थांबले तरी घामाच्या धारा लागत आहेत. यामुळे थंड पेय पिण्याचे प्रमाण वाढल्याने सर्दी, खोकला, तापाच्या रूग्णांची संख्या वाढली आहे.

उन्हापासून संरक्षणासाठी गॉगल, टोपी, स्कार्फ, पांढरे कपडे यांचा वापर केला जात आहे. शहरातील बंधाऱ्यांवर देखील पोहणाऱ्यांची गर्दी पहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाचा प्राण्यांवर देखील परिणाम होताना दिसत आहे. प्राणी घराच्या, इमारतीच्या, झाडांच्या सावलीचा आधार घेताना दिसत आहे. ओलसर जागेत बसून शरीराला गारवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. कामानिमित्त घराबाहेर पडताना शक्यतो अंगभर कपडे घालावेत, जेणेकरून उन्हापासून शरीराचे संरक्षण होऊ शकेल. तसेच पाणी भरपूर प्यावे, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

### उन्हापासून बचावासाठी काळजी घ्या



उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. बाहेर पडताना टोपी, गॉगल, स्कार्फ तसेच अंगभर व हलक्या रंगाचे कपडे वापरावेत. शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये म्हणून वारंवार पाणी, ताक, लिंबूपाणी यांसारखे द्रवपदार्थ घ्यावेत. उन्हात जास्त वेळ राहिल्यास डोकेदुखी, चक्कर, उलट्या यांसारखी लक्षणे दिसू शकतात, त्यामुळे अशी लक्षणे जाणवल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी व गरज असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तसेच लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि प्राणी यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.



## भूमिका

**भाजपच्या अलीकडील राजकीय हालचालींकडे पाहिले असता सत्तेची भूक किती तीव्र झाली आहे, याचे प्रकर्षाने दर्शन घडते. एखाद्या पक्षातील एक-दोन नेत्यांना लक्ष्य करण्याऐवजी संपूर्ण पक्षालाच कमकुवत करण्याची रणनीती अवलंबली जात असल्याचे दिसते. आम आदमी पक्षाच्या संदर्भात घडलेल्या घटनांमधून हे स्पष्ट होते.**

# 'आप'परभावाचा अंत!



केवळ राजकीय स्पर्धा न ठेवता केंद्रीय यंत्रणांच्या साहाय्याने विरोधकांना अडचणीत आणणे हा मार्ग लोकशाहीच्या मूलभूत तत्वांना बाधा देणारा आहे. लोकशाहीत सत्तांतराचा मार्ग हा निवडणुकीतूनच जावा, ही अपेक्षा असते.

मतदारांच्या कौलावर विश्वास ठेवण्याऐवजी तपास यंत्रणांचा वापर करून राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाहीचा अपमानच म्हणावा लागेल. सत्ताधारी पक्षाने आपल्या संघटनात्मक ताकदीवर आणि जनाधारावर विरोधकांना पराभूत करणे अपेक्षित असते. मात्र, सध्याच्या घडामोडींमध्ये ही परंपरा बाजूला पडताना दिसते.

यात विरोधकांचाही काही अंशी दोष आहे. पक्षांतर्गत विसंवाद, नेतृत्वातील कमकुवतपणा आणि वैचारिक अस्थिरता यामुळेच अशा कारवायांना वाव मिळतो. आम आदमी पक्षाच्या बाबतीतही हेच दिसून आले. एकसंघता नसल्यास बाह्य दबावांना तोंड देणे कठीण होते. त्यामुळे केवळ सत्ताधाऱ्यांवर दोषारोप करून चालणार नाही; विरोधकांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

तथापि, मुख्य प्रश्न हा नागरिकांच्या भूमिकेचा आहे. कोणतीही कारवाई आपल्या आवडत्या पक्षावर झाली नाही, तोपर्यंत ती योग्य वाटते, आणि विरोधकांवर झाली तर ती अन्यायकारक वाटते—ही निवडक नैतिकता लोकशाहीस घातक आहे. नागरिकांनी तटस्थपणे विचार केला नाही, तर सत्तेचा गैरवापर रोखणे अशक्य होईल.

आज परिस्थिती अशी आहे की, राजकीय पक्षांतर आणि युती-विरोध यांचे निकषच बदलले आहेत. कालपर्यंत एकमेकांवर कठोर टीका करणारे नेते आज सत्तेसाठी एकत्र येतात, आणि त्यात कुणालाही गैर वाटत नाही. ही प्रवृत्ती दीर्घकालीन दृष्टीने राजकीय संस्कृतीला हानीकारक आहे.

शेवटी, हा प्रश्न केवळ एका पक्षाचा नाही. ही लढाई लोकशाही मूल्यांची आहे. जर नागरिकांनीच या घडामोडींविषयी उदासीनता दाखवली, तर सत्तेचा केंद्रीकरण अधिक वाढेल. म्हणूनच आवश्यक आहे ती जागरूकता, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि सर्वांसाठी समान निकष ठेवण्याची तयारी. अन्यथा, लोकशाहीची केवळ औपचारिकता उरेल आणि तिचा आत्मा हरवेल.

## प्रासंगिक »

### देखावा

**एका गावात एक प्रसिद्ध नकलाकार कार्यक्रमासाठी आला होता. त्याच्या कार्यक्रमाची मोठी जाहिरात झाल्यामुळे प्रेक्षकांची चांगली गर्दी जमली.**

त्याने विविध नेते, पक्षी आणि प्राण्यांचे आवाज अतिशय हुबेहूब काढले. प्रत्येक वेळी लोकांनी टाळ्यांचा कडकडाट करून त्याचे कौतुक केले.

शेवटी प्रेक्षकांनी त्याला डुकराचा आवाज काढण्यास सांगितले. त्याने तोही आवाज काढला आणि लोक पुन्हा खूश झाले. पण गर्दीतल्या एका माणसाने हा आवाज खरा नाही असे सांगितले. नकलाकाराने त्याला स्टेजवर येऊन दाखवण्यास सांगितले.

तो माणूस पोते घेऊन स्टेजवर गेला. त्याने पोत्यात डोके घालून आवाज काढला, पण लोकांनी त्याची थट्टा केली. तेव्हा त्याने पोत्यातून खरे डुकराचे पिल्लू बाहेर काढले आणि म्हणाला, "हा खरा आवाज आहे, पण तुम्हाला तो पटला नाही!"

- तात्पर्य : लोक अनेकदा खऱ्या गुणवत्तेपेक्षा देखाव्याला जास्त महत्त्व देतात.

आखातातील बदलत्या राजकीय आणि सामरिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्र धोरण अधिक सक्रिय आणि दूरदृष्टीपूर्ण होत असल्याचे स्पष्ट दिसते.

# भारताच्या ऊर्जा स्थैर्याला बळकटी देणारा दौरा!





इराण-अमेरिका संघर्ष तात्पुरता शमला असला तरी त्यामागील अनिश्चितता अद्याप कायम आहे. अशा वेळी ऊर्जा सुरक्षितता आणि परदेशातील भारतीयांचे संरक्षण या दोन आघाड्यांवर भारताला सतर्क राहणे अत्यावश्यक ठरते. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आखाती देशांशी सातत्यपूर्ण संपर्क राखण्यावर भर दिला आहे.

डॉ. जयशंकर यांचा संयुक्त अरब अमिराती दौरा हा केवळ औपचारिक नव्हता, तर भारताच्या ऊर्जा आणि सामरिक हितांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या दौऱ्यात व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा पुरवठा, तसेच प्रादेशिक सुरक्षेसंदर्भात सखोल चर्चा झाली. विशेषतः जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जापुरवठा साखळी मजबूत ठेवणे आणि समुद्री वाहतूक सुरक्षित ठेवणे हे मुद्दे अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

भारताची वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक गरजा लक्षात घेता तेल व गॅसचा सातत्यपूर्ण पुरवठा ही राष्ट्रीय प्राधान्याची बाब आहे. यूएई आणि कतारसारख्या देशांशी मजबूत संबंध राखून भारताने या गरजांची पूर्तता करण्यासाठी योग्य दिशा निवडली आहे. त्याचबरोबर द्विपक्षीय व्यापार वाढवणे आणि गुंतवणुकीस चालना देणे यामुळे आर्थिक सहकार्यालाही नवी गती मिळत आहे.

या दौऱ्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशातील भारतीयांचे कल्याण. यूएईमध्ये मोठ्या प्रमाणावर भारतीय नागरिक वास्तव्यास असून त्यांच्या सुरक्षेची आणि हितांची जबाबदारी भारत सरकारने प्राधान्याने घेतली आहे. स्थानिक प्रशासनाशी संवाद साधून आणि भारतीय समुदायाशी संपर्क ठेवून ही बांधिलकी अधोरेखित करण्यात आली.

एकंदरीत, डॉ. जयशंकर यांचा यूएई दौरा हा भारताच्या परराष्ट्र धोरणातील संतुलित आणि व्यावहारिक दृष्टिकोनाचे उदाहरण आहे. ऊर्जा सुरक्षितता, आर्थिक सहकार्य आणि भारतीयांचे संरक्षण या तिन्ही आघाड्यांवर या दौऱ्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताने घेतलेली ही सक्रिय भूमिका देशाच्या दीर्घकालीन हितासाठी निश्चितच फायदेशीर ठरणारी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नितेश राणेंना एक महिना कारावासाची शिक्षा

## मुंबई-गोवा महामार्ग अभियंता चिखलफेक प्रकरणात न्यायालयाचा निकाल

**महाईन्यूज । सावंतवाडी**

**मुंबई-गोवा महामार्ग अभियंत्यावर चिखलफेक करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याच्या बहुचर्चित प्रकरणात सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. मात्र, सार्वजनिक शांततेचा भंग करणे आणि इतरांना त्यास उद्युक्त करणे या कलमाखाली त्यांना दोषी धरून एक महिना कारावास आणि १ लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.**



जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती व्ही. एस. देशमुख यांनी आज हा निकाल दिला. या प्रकरणातील अन्य २९ संशयित आरोपींची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. दरम्यान, या शिक्षेविरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली जाणार असून, तोपर्यंत या शिक्षेला स्थगिती देण्यात आली असल्याची माहिती त्यांचे वकील ॲड. संग्राम देसाई यांनी दिली.

४ जुलै २०१९ रोजी मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाच्या कामाची पाहणी करण्यासाठी कणकवलीचे तत्कालीन आमदार नितेश राणे यांनी महामार्ग अभियंता प्रकाश शेडेकर यांना गडनदी पुलावर बोलावले होते. यावेळी कामाच्या दर्जाबाबत संताप व्यक्त करत शेडेकर यांच्या अंगावर चिखल ओतण्यात आला होता. तसेच त्यांना बांधून ठेवून चिखलातून चालत नेल्याची घटना घडली होती.

याप्रकरणी प्रकाश शेडेकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आमदार नितेश राणे यांच्यासह एकूण ३० जणांवर भा.द.वि. कलम ३५३ (सरकारी कामात अडथळा), ३४२, १४७, ५०४, ५०६ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियमाच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते.

दीर्घकाळ चाललेल्या या खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त जिल्हा सरकारी अभियोक्ता रुपेश देसाई यांनी काम पाहिले. न्यायालयाने आज महत्त्वपूर्ण निकाल देत मुख्य कलमांतून राणे यांची मुक्तता केली, मात्र शांतता भंगाच्या प्रकरणात त्यांना शिक्षा सुनावली आहे.

### काय होते नेमके प्रकरण?

४ जुलै २०१९ रोजी कणकवली विधानसभा मतदारसंघाचे तत्कालीन आमदार नितेश राणे यांनी महामार्ग चौपदरीकरणाच्या कामाची पाहणी करण्यासाठी अभियंता प्रकाश शेडेकर यांना कणकवली येथील गडनदी पुलावर बोलावले होते. यावेळी संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी शेडेकर यांच्या अंगावर चिखल ओतून त्यांना पुलाला बांधून ठेवले होते. या घटनेनंतर राज्यभर मोठी खळबळ माजली होती.

# राज्यात तीन महिन्यांत ९२५९ रस्ते अपघात, ३८५८ प्रवाशांचा मृत्यू

**महाईन्यूज । अकोला**

**राज्यात दररोज सरासरी १०३ रस्ते अपघात घडत आहेत. प्राणघातक अपघातांची संख्या दैनंदिन सुमारे ४० असून त्यामध्ये दरदिवशी ४३ जणांचा अपघाती मृत्यू होतो. परिवहन विभागाने दिलेल्या यावर्षीच्या जानेवारी ते मार्च दरम्यानच्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले. मोठ्या संख्येने होणारे अपघात व त्यात होणारी प्राणहानी लक्षात घेता रस्ते वाहतुकीच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह लागले आहे.**




२०२६ वर्षांत जानेवारी ते मार्च महिन्यातील ९० दिवसांच्या आकडेवाडीनुसार, राज्यात नऊ हजार २५९ अपघात झाले आहेत. प्राणघातक अपघातांची संख्या तीन हजार ५९४ असून त्यामध्ये तीन हजार ८५८ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. राज्यात दररोज सरासरी १०३ अपघात होत आहेत. दैनंदिन सुमारे ४० प्राणघातक अपघात होत असून त्यामध्ये दरदिवशी ४३ जणांचा अपघाती मृत्यू ओढवतो. राज्यातील अपघातांची ही संख्या मोठी असून हजारो नागरिकांचा बळी गेला. सातत्याने होणाऱ्या अपघातांमागे विविध कारणे समोर आली आहेत.

राज्यात २०२५ मध्ये जानेवारी ते मार्चदरम्यान नऊ हजार ३८५ रस्ते अपघात झाले असून प्राणघातक अपघातांची संख्या तीन हजार ८७८ आहे. यामध्ये चार हजार १७९ जणांना आपले प्राण गमवावे लागले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी अपघात व मृत्यूच्या संख्येत नाममात्र घट झाल्याचे चित्र दिसून येते.

### अपघातांवर नियंत्रण नाहीच

राज्यात रस्ते अपघाताचा गंभीर प्रश्न आहे. आजही दररोज शेकडो अपघात घडत असल्याने त्यावर नियंत्रण मिळवण्याचे मोठे आव्हान परिवहन विभागापुढे उभे ठाकले. दरम्यान, सन २०३० पर्यंत अपघाताची संख्या ५० टक्के कमी करण्याचे उद्दिष्ट परिवहन विभागाने ठेवले आहे. त्यासाठी रस्ता सुरक्षा उपाययोजना केल्या जात आहेत. राज्यस्तरावर व प्रत्येक जिल्हास्तरावर रस्ता सुरक्षा कक्ष निर्माण केले. प्रत्येक जिल्ह्याची अपघाताची कारणे व तेथील आवश्यकता विचारात घेऊन रस्ता सुरक्षा उपाययोजना आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. याशिवायही विविध उपाययोजना केल्या जात असल्याचे परिवहन विभागाकडून सांगण्यात आले. राज्यातील अपघातांची संख्या मात्र अपेक्षेप्रमाणे कमी झालेली नाही, ही वास्तविकता नाकारता येणार नाही.



# पाणीपुरी खाल्ल्यामुळे ६० जणांना विषबाधा

## एका चिमुकल्याचा मृत्यू; झारखंडमधील धक्कादायक प्रकार!

**महाईन्यूज** | झारखंड

**पाणीपुरी हा अनेकांचा आवडता खाद्यपदार्थ. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पाणीपुरीच्या ठेल्यांभोवती किंवा अगदी रीतसर दुकानात विकल्या जाणाऱ्या पाणीपुरीसाठी अनेक ठिकाणी मोठ्या रांगादेखील पाहायला मिळतात. पण याचप्रमाणे काही ठिकाणी पाणीपुरी विक्रेत्यांकडून स्वच्छतेची कोणतीही काळजी कशी घेतली जात नाही, पाणीपुरीसाठी अस्वच्छ पाणी कसं वापरलं जातं यासारखे व्हिडीओदेखील वेळोवेळी व्हायरल होत असतात. असाच काहीसा प्रकार झारखंडच्या गिरिदी जिल्ह्यात समोर आला असून पाणीपुरी खाल्ल्यामुळे दोन गावांमधल्या ६० जणांना विषबाधा झाल्याचे आरोप होऊ लागले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे या आजारात एका चिमुकल्याचा मृत्यूदेखील झाला आहे.**



गिरीदी जिल्ह्यातल्या बाजतो गावचे सरपंच जितेंद्र वर्मा यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार, त्या गावातील जवळपास ४० ते ५० जणांना रविवारी हगवणीची लक्षणं दिसून आली. यापैकी एका सहा वर्षांच्या चिमुकल्याचा उपचारांअभावी मृत्यू झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी बाजूच्या पालमो गावातूनदेखील अशाच लक्षणांसाठी २० जणांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या लक्षणांच्या रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे.

दरम्यान, हा प्रकार उघड झाल्यानंतर दोन्ही गावातील गावकऱ्यांनी केलेल्या तक्रारीवरून एका पाणीपुरी विक्रेत्यावर संशय व्यक्त केला जात आहे. आजारी पडलेल्या सर्व गावकऱ्यांनी त्याच पाणीपुरी विक्रेत्याकडून पाणीपुरी खाल्ली होती, असा दावा गावकऱ्यांनी केला आहे. हा पाणीपुरी विक्रेता पालमो गावातला आहे. यासंदर्भात जितेंद्र वर्मा यांनी केलेल्या दाव्यानुसार, सदर पाणीपुरी विक्रेत्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं, पण त्याच दिवशी रात्री त्याला सोडूनही देण्यात आलं.

दरम्यान, आपण पाणीपुरी विक्रेत्याविरोधात तक्रार करणार असल्याचं राम किशोर प्रसाद वर्मा यांनी सांगितलं. "जर माझ्या मुलाला वेळीच चांगले उपचार मिळाले असते, तर कदाचित त्याचा जीव वाचला असता. मी रुग्णालयात त्यावेळी उपस्थित डॉक्टर आणि नर्सविरोधातही तक्रार करणार आहे", असं ते म्हणाले. सदर रुग्णालयात याच लक्षणांसाठी इतर रुग्णांवर उपचार केले जात असून अनेकांना सलाईनदेखील लावण्यात आली आहे.

### रुग्णालयाच्या असंवेदनशीलतेचा बळी

या प्रकारामुळे मृत्यू पावलेल्या सहा वर्षांच्या चिमुकल्याच्या वडिलांनी मुलाच्या मृत्यूसाठी रुग्णालयातील अनास्थेला दोषी धरलं आहे. "माझा मुलगा आजारी पडल्यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यासाठी आम्ही दुपारी दीडच्या सुमारास रुग्णवाहिकेसाठी फोन करू लागलो. पण बराच काळ कुणीच प्रतिसाद दिला नाही. नंतर रुग्णवाहिका जवळपास ३ वाजता आली. रुग्णालयात पोहोचल्यानंतरदेखील कोणतेही तातडीचे उपचार मुलाला देण्यात आले नाहीत. जवळपास दीड तास त्याला कोणत्याही डॉक्टर वा नर्सनं तपासलंदेखील नाही. माझ्या मुलाचा माझ्या मांडीवरच जीव गेला", अशा भावनिक शब्दांत मुलाचे वडील राम किशोर प्रसाद वर्मा यांनी आपला संताप व्यक्त केला.

# इराणने संपर्क साधावा! युद्धसमाप्तीच्या चर्चेसाठी ट्रम्प यांची भूमिका

**महाईन्यूज** | अमेरिका

**"पश्चिम आशियातील युद्ध थांबवण्यासाठी आमच्याशी चर्चा करायची असेल तर इराणने आमच्याशी संपर्क साधावा," असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी पुन्हा एकदा सांगितले. शुक्रवारी पाकिस्तानला पोहोचलेले इराणचे परराष्ट्रमंत्री सईद अब्बास अराघची यांनी शनिवारी पाकिस्तानी नेत्यांशी चर्चा केली. मात्र, अमेरिकी प्रतिनिधी पोहोचण्याच्या आधीच ते ओमानच्या दौऱ्यावर निघून गेले. त्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकी शिष्टमंडळाचा पाकिस्तान दौरा रद्द करत असल्याचे जाहीर केले होते. त्याचा त्यांनी रविवारी पुनरुच्चार केला.**



### अराघची पुन्हा पाकिस्तानात

अराघची रशियाला जाण्यापूर्वी पाकिस्तानच्या नेत्यांशी चर्चा करत असल्याची माहिती पाकिस्तान सरकारच्या सूत्रांनी दिली. तर इराणच्या तस्निम या निमसरकारी वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, या चर्चेमध्ये होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नवे कायदे लागू करणे, युद्धाची नुकसानभरपाई मिळणे, पुन्हा लष्करी हल्ले न होणे आणि अमेरिकी नौदलाने केलेली नाकेबंदी हटवणे या इराणच्या मागण्यांचा समावेश असेल. अमेरिकेच्या मागण्या अतिरेकी स्वरूपाच्या असल्याचे शनिवारी इराणने म्हटले होते. मात्र, ट्रम्प यांनी पुन्हा थेट चर्चा करण्याचे आवाहन केल्यानंतर इराणकडून प्रतिक्रिया आलेली नाही.

यादरम्यान, ओमानचा एक दिवसाचा दौरा आटोपून अराघची रविवारी पुन्हा पाकिस्तानला परतले. ते रशियाला जाण्यापूर्वी थोडावेळ पाकिस्तानला थांबल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने पाकिस्तानात तैनात केलेली सुरक्षा उपकरणे हटवली आहेत. त्यामुळे अमेरिका-इराण चर्चेची पुढील फेरी पाकिस्तानात होण्याची शक्यता मावळली असल्याचे मानले जात आहे. असे असले तरी, इराण आमच्याशी थेट संपर्क साधू शकतो असे सांगून ट्रम्प यांनी चर्चेस तयार असल्याचा संदेशही दिला आहे.

इराणचा अणुकार्यक्रम आणि युद्ध सुरू झाल्यापासून होर्मुझची सामुद्रधुनी हे वाटाघाटींसाठी महत्त्वाचे मुद्दे असल्याचे मानले जात आहे.



# दुसऱ्या धर्मात लग्न करू शकत नाही रीम शेख

टीव्ही अभिनेत्री रीम शेखने दुसऱ्या धर्मातील मुलासोबत लग्न करण्याबद्दल आपली भूमिका स्पष्ट केली आहे. रीम सध्या सिंगल असून ती खूप धार्मिक असल्याचे तिने सांगितले. जर एखादा मुलगा दुसऱ्या धर्माचा असेल, तर ती त्याच्यासोबत जुळवून घेऊ शकणार नाही, असेही तिने स्पष्टपणे सांगितले. एका पॉडकास्टमध्ये रीम शेख म्हणाली की, 'माझा माझ्या धर्मावर विश्वास आहे. मी दिवसातून पाच वेळा नमाज पठण करते. मी रमजानमध्ये उपवास करते. म्हणूनच मी दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीशी लग्न करू शकत नाही. मी देवाची प्रार्थना करते आणि जेव्हा माझ्या आयुष्यात काही घडतं, तेव्हा मी त्याच्याकडे जाते.' रीम पुढे म्हणाली, 'जर एखादा मुलगा दुसऱ्या धर्माचा असेल, तर मी त्याच्यासोबत जुळवून घेऊ शकणार नाही. मला माहित आहे की, हे बोलल्याबद्दल मला शिव्या खाव्या लागतील. पण मी वेगळ्या धर्माच्या मुलासोबत राहू शकत नाही.' रीमने सांगितलं की, तिच्या आई-वडिलांचं आंतरधर्मीय लग्न झालं होतं. रीमची आई शीतल हिंदू आहे आणि तिचे वडील मुस्लीम आहेत. रीम शेखच्या आईवडिलांचा घटस्फोट झाला असून, त्यांच्याबाबत तिने सांगितले की, तिचं बालपण खूप दु:खात गेलं. तिने घरात अनेकदा हिंसा पाहिल्याने तिच्या मनात राग आणि भीतीची भावना होती. दरम्यान, रीमच्या आईने घटस्फोटानंतर दुसरं लग्न केलं असून त्यांना एक मुलगी आहे. रीमचे तिच्या सावत्र बहिणीसोबत चांगले संबंध आहेत.



# 'सुनो ना दिल' गाण्याने जिंकली मने

कॉमेडियन आणि अभिनेता कपिल शर्मा सध्या त्याच्या आगामी 'दादी की शादी' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटातील 'सुनो ना दिल' हे नवीन रोमँटिक गाणं नुकतंच रिलीज झालं असून, प्रेक्षकांकडून त्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. गाणं रिलीज होताच सोशल मीडियावर ट्रेंड होऊ लागलं आहे. या गाण्याची सर्वात मोठी खासियत म्हणजे त्याची सुरेल गायकी. 'सुनो ना दिल' या गाण्याला सोनू निगम आणि सुनिधी चौहान यांनी आपला आवाज दिला आहे. या दोन्ही लोकप्रिय गायकांनी अनेक वर्षांनंतर एकत्र येत रोमँटिक गाणं सादर केल्यामुळे चाहत्यांसाठी हा एक खास अनुभव ठरला आहे. गाण्याचे शब्द आणि संगीत अतिशय भावपूर्ण असून, ते थेट मनाला भिडतात. या गाण्यात कपिल शर्मा आणि अभिनेत्री सादिया खातिब यांची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री खूपच सुंदर दिसते. दोघांमधील निरागस प्रेम आणि भावनिक क्षण गाण्याला अधिक खास बनवतात. गाण्याच्या दृश्यांमध्ये प्रेमाच्या सुरुवातीच्या भावना अतिशय साध्या आणि सुंदर पद्धतीने दाखवण्यात आल्या आहेत, ज्यामुळे प्रेक्षकांना त्यात सहजपणे जोडता येते.

# कोर्टाचा आदेश...बँक खाते तात्काळ सुरु करा, एनसीबीला सुनावले रिया चक्रवर्तीला दिलासा



बॉलिवूड अभिनेत्री रिया चक्रवर्ती हिला मोठा कायदेशीर दिलासा मिळाला आहे. मुंबईतील विशेष एनडीपीएस न्यायालयाने तिचे आणि तिच्या कुटुंबीयांचे बँक खाते तात्काळ सुरू (अनफ्रीज) करण्याचा आदेश दिला आहे. या निर्णयामुळे रिया आणि तिच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून, न्यायालयाने एनसीबीच्या (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) कारवाईवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सुशांत सिंह राजपूत प्रकरणाशी संबंधित ड्रग्स तपासादरम्यान २०२० साली रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबीयांचे बँक खाते गोठवण्यात आले होते. त्यानंतर बराच काळ उलटून गेला, मात्र ही खाती अजूनही बंदच होती. त्यामुळे रिया आणि तिच्या कुटुंबाला आर्थिक व्यवहार करण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, एनडीपीएस कायद्यानुसार कोणतेही बँक खाते गोठवताना ठरावीक कायदेशीर प्रक्रिया पाळणे आवश्यक असते. विशेषतः, खाते गोठवल्यानंतर ३० दिवसांच्या आत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक असते. मात्र, या प्रकरणात एनसीबीने ही प्रक्रिया पूर्ण केली नव्हती. त्यामुळे ही कारवाई कायदेशीरदृष्ट्या चुकीची ठरते, असे न्यायालयाने नमूद केले. या निर्णयासाठी न्यायालयाने बॉम्बे उच्च न्यायालयाच्या आधीच्या निकालांचा आधार घेतला. तसेच, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमांनुसार बँक खाती पुन्हा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेष म्हणजे, रिया चक्रवर्तीला याआधीच विविध आरोपांतून दिलासा मिळाला होता. तरीही तिची बँक खाती बंद ठेवण्यात आली होती, हे न्यायालयाने गंभीरतेने घेतले. या प्रकरणात रिया चक्रवर्ती, तिचा भाऊ शौविक चक्रवर्ती आणि आई संध्या चक्रवर्ती यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सुनावणीदरम्यान अभियोजन पक्षानेही मान्य केले की आवश्यक मंजुरी घेण्यात आलेली नव्हती. त्यामुळे न्यायालयाने या तिघांच्या बाजूने निर्णय देत त्यांचे बँक खाते अनफ्रीज करण्याचा आदेश दिला. न्यायालयाने एनडीपीएस कायद्यातील कलम ६८एफचा उल्लेख करत स्पष्ट केले की, कोणतीही मालमत्ता किंवा खाते गोठवण्याचा आदेश ३० दिवसांच्या आत मंजूर न झाल्यास त्याला कायदेशीर वैधता राहत नाही. या प्रकरणात अशी कोणतीही मंजुरी नसल्यामुळे एनसीबीची कारवाई अमान्य ठरवण्यात आली. या निर्णयामुळे रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. आता ते पुन्हा त्यांच्या बँक व्यवहारांना सुरुवात करू शकतील. या प्रकरणामुळे तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# एन्गिडीला हॉस्पिटलमधून 'डिस्चार्ज'

## संदेशांबद्दल धन्यवाद, सर्व काही ठीक आहे : एन्गिडी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील सामन्यादरम्यान डोक्याला दुखापत झाल्यानंतर, दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज लुंगी एन्गिडीने चाहत्यांना दिलासा देणारे एक निवेदन दिले आहे. या घटनेनंतर आपली प्रकृती पूर्णपणे ठीक असल्याचे त्याने चाहत्यांना त्यातून सांगितले आहे.**



शनिवारी दुपारी दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील सामन्यादरम्यान मैदानावर एका चिंताजनक प्रसंगाचा भाग ठरलेल्या या दक्षिण आफ्रिकन वेगवान गोलंदाजाने, रविवारी आपल्या 'इन्स्टाग्राम' या सोशल मीडिया हँडलद्वारे चाहत्यांनी व्यक्त केलेल्या काळजीबद्दल त्यांचे आभार मानले. दुखापतीच्या या घटनेनंतर दिलेल्या आपल्या पहिल्याच सार्वजनिक प्रतिक्रियेत, इन्स्टाग्रामवर एक 'स्टोरी' शेअर करताना एन्गिडीने लिहिले, 'तुमच्या संदेशांबद्दल धन्यवाद, सर्व काही ठीक आहे'. या संदेशाद्वारे त्याने आपल्या प्रकृतीबद्दलच्या भीतीचे निरसन केले.

अरुण जेटली स्टेडियमवर पंजाब किंग्स विरुद्धच्या सामन्यादरम्यान दुखापत झाल्यानंतर एन्गिडीला दिल्लीतील एका रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. या वेगवान गोलंदाजाच्या डोक्याच्या मागील बाजूस आणि मानेवर अत्यंत जोरात (धोकादायक पद्धतीने) जमिनीवर आघात झाला होता. यातून बरा झाल्यानंतर त्याला सुपर स्पेशालिटी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. सामन्यादरम्यान डोक्याला दुखापत झाल्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दिल्ली कॅपिटल्सचे अध्यक्ष आणि सह-मालक किरण कुमार ग्रांधी यांनी रुग्णालयात जाऊन एन्गिडीची भेट घेतली.




# अंगक्रिश रघुवंशीला वादग्रस्त पद्धतीने बाद झाल्यानंतर केलेल्या कृतीमुळे मोठा फटका

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**लखनौ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्सच्या सामन्यात मोठा वाद पाहायला मिळाला. अंगक्रिश रघुवंशी ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डमुळे बाद देण्यात आलं होतं. हे पाहून सर्वच जण अवाक् झाले, अंगक्रिश रघुवंशीदेखील पंचांशी हुज्जत घालत होता आणि अभिषेक नायरदेखील चौथ्या पंचांशी वाद घालताना दिसला. या सर्व प्रकरणानंतर अंगक्रिश रघुवंशी चर्चेत असताना त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.**





पहिल्या डावातील पाचव्या षटकातील अखेरच्या चेंडूवर रघुवंशी हलक्या हाताने खेळलेल्या फटक्यानंतर धाव घेण्यासाठी धावू लागला. तितक्यात ग्रीनने त्याला पुन्हा क्रीजवर जाण्याचा इशारा केला. त्यानंतर मागे परतताना रघुवंशी वेगळ्या अँगलमध्ये धावला. ज्यामुळे स्टंपच्या दिशेने फेकलेला चेंडू त्याच्या शरीराला लागला. यामुळे मोहम्मद शमी व ऋषभ पंत यांनी ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डसाठी अपील केलं. तिसऱ्या पंचांनीही व्हीडिओ पाहिल्यानंतर तो चेंडूच्या मध्ये आल्याचं सांगत त्याला बाद दिलं.

अंगक्रिश रघुवंशी बाद दिल्यानंतर पंचांशी चर्चा करताना दिसला. पंचांनी त्याला समजावत मैदानाबाहेर जाण्यास सांगितलं. मैदानाबाहेर जात असताना रघुवंशीने रागात बॅट बाऊंड्री रोपवर मारली आणि हेल्मेट फेकून देत आपला संताप व्यक्त केला. याचाच फटका आता त्याला बसला आहे.

आयपीएल निवेदनात म्हटलं आहे की, कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज आणि यष्टिरक्षक अंगक्रिश रघुवंशी याच्यावर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात (मॅच क्र. ३८) आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे. त्याच्या सामन्याच्या मानधनातून २० टक्के दंड आकारण्यात आला असून त्याला एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे.

पहिल्या डावातील या वादग्रस्त घटनेमुळे सामना काही काळासाठी तणावपूर्ण वातावरणात गेला. रघुवंशीच्या धाव घेण्याच्या निर्णयावर आणि त्याच्या हालचालीवर क्रिकेट तज्ज्ञांमध्येही चर्चा रंगली. ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड हा नियम क्वचितच लागू होत असल्याने चाहत्यांनाही हा निर्णय धक्कादायक वाटला. सोशल मीडियावर या निर्णयाबाबत मिश्र प्रतिक्रिया उमटताना दिसल्या. काहींनी पंचांचा निर्णय योग्य असल्याचं म्हटलं, तर काहींनी तो कठोर असल्याची टीका केली. रघुवंशीच्या रागाच्या भरात केलेल्या वर्तनावरही टीका होत आहे.

## अंगक्रिश रघुवंशीला दंड का ठोठावण्यात आला?

रघुवंशीने आयपीएलच्या आचारसंहितेतील कलम २.२ चे उल्लंघन केल्याचे आढळले. हे कलम सामन्यादरम्यान क्रिकेट साहित्य, कपडे, मैदानावरील उपकरणे किंवा इतर वस्तूंशी गैरवर्तन करण्यासंदर्भात आहे. ही घटना पाचव्या षटकात घडली. 'ऑब्स्ट्रक्टिंग द फील्ड'मुळे बाद ठरल्यानंतर रघुवंशीने रागाच्या भरात बॅटने बाउंड्री कुशनवर जोरात मारलं आणि त्यानंतर हेल्मेटही संतापाने डगआउटकडे फेकलं. रघुवंशीने आपली चूक मान्य केली असून मॅच रेफरीने दिलेली शिक्षा स्वीकारली आहे.

# समन्वयाअभावी क्रीडांगण दुर्दशा; जनावरांचा वावर

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**पिंपरीगावातील पवनेश्वर मंदिराजवळील महापालिकेच्या क्रीडांगणाच्या कामात प्रशासनातील समन्वयाचा अभाव दिसून येत आहे. स्थापत्य आणि क्रीडा विभाग एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी झटकत आहेत. परिणामी उद्घाटन, लोकार्पण न होता क्रीडांगण वापराविना पडून आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही याकडे दुर्लक्ष केले आहे.**

पिंपरीगावात पवना नदीच्या काठावर क्रीडांगण विकसित करण्यात आले आहे. येथे जॉगिंग ट्रॅक, कुस्तीचा आखाडा उभारण्यात आला आहे. मात्र, क्रीडांगणाच्या एका बाजूला सुरक्षाभिंतीऐवजी तारेचे कुंपण आहे. काही ठिकाणी तारा तोडण्यात आल्या आहेत. क्रीडांगणामध्ये भटक्या श्वानांचा आणि मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. क्रीडांगणात सर्वत्र जनावरांचे शेण पडलेले पहायला मिळत आहे.

क्रीडांगणामधील पाण्याच्या टाकीला झाकण गायब झाले आहे. त्यामुळे येथे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनामध्ये या क्रीडांगणाबाबत समन्वयाचा अभाव आहे. स्थापत्य विभागाकडून क्रीडांगण विकसित करण्यात आले. क्रीडांगण क्रीडा विभागाकडे हस्तांतरीत केले असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. मात्र, कामे अपूर्ण असून आम्ही आमच्या ताब्यात क्रीडांगण घेतलेले नाही, असे क्रीडा विभागाकडून सांगण्यात येत आहे.

## लोकप्रतिनिधींचे समस्या निवारणाकडे दुर्लक्ष...

क्रीडांगणाचे काम पूर्ण करून समस्या सोडविण्याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यासोबतच स्थानिक लोकप्रतिनिधींकडूनही याची दखल घेतली जात नाही. त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.






# पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन 'कटिबद्ध'!

## पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाची निवडणूक शांततेत

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघाच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक शांततेत व उत्साहात पार पडली. या निवडणुकीचा अधिकृत निकाल प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी जाहीर केला. विशेष म्हणजे, महासंघाचे मावळते अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी निवडणूक बिनविरोध करावी, असा संदेश अर्ज माघारी घेतला.**



सोसायटी फेडरेशनच्या कमिटीसाठी निवडणूक सन 2026 ते 2031 या कालावधीसाठी घेण्यात आली. एकूण ११ सदस्यांची ही निवडणूक सर्वसाधारण मतदार संघातून घेण्यात आली असून, एकूण अधिकृत 27 मते पडली. यापैकी सर्व 27 मते वैध ठरली असून, एकही मत अवैध झाले नाही. रविवार, दि. 26 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 वाजता विशेष अधिमंडळ बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच मतदान प्रक्रिया पूर्ण करून निकाल जाहीर करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

या निवडणुकीत विविध सोसायटींच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. प्राधिकृत अधिकारी विलास लिंबळे यांनी निवडणुकीचा सविस्तर अहवाल व बैठकीचे इतिवृत्त संबंधित प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (3) यांच्याकडे सादर केले आहे.या निवडणुकीमुळे संस्थेच्या पुढील पाच वर्षांच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळणार असून, सदस्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

नवीन कार्यकारिणीमध्ये पदवाटप दोन-तीन दिवसांत करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी फेडरेशन कटिबद्ध राहील, असा संकल्प नवनिर्वाचित सदस्यांनी केला आहे.

### विजयी उमेदवारांची नावे

सचिन लोंढे, अरुण देशमुख, सचिन गुणाले, अधिकराव दिवे-पाटील, विकास बाबर, प्रदीप घोरपडे, सचिन सिंध्ये, अजय तोडकर, रोहित सावंत, वैभव चौधरी, रोहित पाठक.

### निवडणूक झाली, तरी एकसंघ काम करणार

सोसायटी फेडरेशनची निवडणूक बिनविरोध व्हावी. या करिता सर्व सदस्यांनी प्रयत्न केला. मात्र, ११ जागांसाठी १६ उमेदवारी अर्ज दाखल झाले. ज्येष्ठ सदस्यांनी सर्वांना सहमतीने निवडणूक करा आणि बिनविरोध करण्याबाबत संवाद केला. त्यानंतर माजी अध्यक्ष दत्तात्रय देशमुख यांनी पुढाकार घेतला आणि स्वत:चा अर्ज माघारी घेतला. तसेच, "आपण निवडणूक बिनविरोध करु आणि सकारात्मक संदेश देवू." अशी भूमिका मांडली. १६ पैकी दोन अर्ज माघारी झाले. पण, ३ अर्ज जास्तीचे असल्यामुळे निवडणूक घेणे अपरिहार्य ठरले. अखेर निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदान घेण्याचा निर्णय घेतला. मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि सर्वाधिक मते मिळवलेल्या ११ विजयी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित सदस्यांमध्ये ज्या सहकाऱ्यांना संधी मिळाली नाही. त्यांना फेडरेशनवर तज्ञ- सल्लागार सदस्यपदी नियुक्ति करण्याचे विचाराधीन आहे. फेडरेशन आणि सोसायटीधारकांचे कार्य एकजुटीने आणि सक्षमपणे करण्यात येईल. यावर उपस्थित सर्व सदस्यांचे एकमत झाले आहे.

# पवना धरणातून गाळ काढण्यास प्रारंभ; खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याच्या उद्देशाने धरणातून गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सलग दहाव्या वर्षी धरणातून गाळ काढण्यात येत असून, त्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढाकार घेतला आहे. शासनाचा कोणताही निधी न घेता लोकसहभागातून गाळ काढला जात आहे. गाळ काढल्याने धरणातील साठवण क्षमतेत वाढ झाली असून उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत नाही.**



पवना धरणातून गाळ काढण्याच्या कामाला रविवारपासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी विधिवत पूजन करून मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात झाली. खासदार बारणे यांनी गेल्या १० वर्षांपासून शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता लोकसहभागातून हे गाळ काढण्याचे काम सातत्याने सुरू ठेवले आहे. यामुळे धरणातील पाणीसाठा वाढण्यास मदत होत असून, परिसरातील जलसंधारणाला बळ मिळत आहे. यंदाही पवना धरणातील जास्तीत जास्त गाळ काढून पाणीसाठ्यात वाढ करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, मावळ तालुका प्रमुख राम सावंत, उपतालुका प्रमुख अमित कुंभार, सोमनाथ कोंडे, मदनभाऊ शेडगे, युवासेना जिल्हा प्रमुख सागर पाचरणे, उपजिल्हा प्रमुख दत्ताभाऊ केदारी, कामशेत शहर प्रमुख सतीश इंगवले, भगवान भिकोले, माजी सरपंच लाला गोंते, माजी उपसरपंच काळूभाऊ उंबरकर, अक्षय उंबरकर, भगवान दरेकर, बाळासाहेब दरेकर, एकनाथ दरेकर, अमित मोरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या ५० वर्षांपासून पवना धरणातील गाळ काढला जात नव्हता. त्यामुळे पाणी साठण्यास अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे गेल्या नऊ वर्षांपासून धरणातील गाळ काढण्यास सुरुवात केली. परिणामी, धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जाऊ लागले नाही. उन्हाळ्यात देखील पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. पावसाळा सुरू होईपर्यंत गाळ काढण्याचे काम चालू राहणार आहे.

खासदार बारणे म्हणाले, पवना धरणातून पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा होतो. या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साठला जातो. त्यामुळे पाणीसाठ्यात अडथळा निर्माण होतो. परिणामी पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जाण्याची वेळ येते. धरणातून गाळ काढण्याला सुरुवात करण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड शहराला दोन दिवसाआड पाणी मिळत होते. पाण्याची मोठी टंचाई जाणवत होती. त्यामुळे मागील नऊ वर्षांपासून दरवर्षी उन्हाळ्यात धरणातील गाळ काढण्यात येत आहे. आत्तापर्यंत ८५ हजार क्युबिक मीटर गाळ धरणातून काढला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे उन्हाळ्यातही तीव्र पाणीटंचाई जाणवत नाही.

### गाळातून गुलाब शेतीही फुलली

पवना धरणातील काढलेला गाळ मावळातील शेतकऱ्यांना निशुल्क दिला जातो. मावळ तालुक्यातून मोठ्या प्रमाणात गुलाबाची जगात निर्यात केली जाते. गुलाब शेतकऱ्यांना पोयटा मातीचा फायदा होता. त्यामुळे गुलाबाच्या उत्पन्नात भर पडते. गुलाबाच्या शेतीतही वाढ झाली. पाणीसाठवण क्षमताही वाढली आणि गुलाबाची शेतीही फुलल्याने नागरिकांना दुहेरी फायदा होत आहे. त्यामुळे स्थानिकांनी खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले आहेत.

# शहरात मनसेच्या संघटनबांधणीला नवे बळ!

## अमित राजसाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) संघटनात्मक बळकटीसाठी पिंपरी-चिंचवड शहरात महत्त्वपूर्ण हालचालींना वेग आला आहे. पक्षाध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसे नेते अमित राजसाहेब ठाकरे, अविनाशजी अभ्यंकर आणि राज्य सरचिटणीस अजय खोपकर यांची पुणे जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**




> पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक आणि तरुणाईचे शहर असून इथल्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी आम्ही सातत्याने इथे उपस्थित राहणार आहोत. प्रत्येक कार्यकर्त्याशी थेट संवाद साधून संघटन अधिक मजबूत करणे आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. मनसेचे विचार आणि कामाची दिशा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर आमचा भर राहील.
>
> **- अमित ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना.**

नियुक्तीनंतर प्रथमच अमित ठाकरे आणि अविनाश अभ्यंकर यांनी पिंपरी-चिंचवड शहराचा दौरा करत स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सखोल संवाद साधला. या दौऱ्यादरम्यान विविध संघटनांच्या स्वतंत्र बैठका घेण्यात आल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, विद्यार्थी सेना, वाहतूक सेना, कर्मचारी सेना, चित्रपट सेना, जनहित व विधी कक्षा तसेच महिला सेनेच्या पदाधिकाऱ्यांशी स्वतंत्र 'वन टू वन' संवाद साधण्यात आला. या चर्चांमध्ये पक्षबांधणी, महानगरपालिका स्तरावरील कामकाज तसेच शहरातील राजकीय घडामोडींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शहराध्यक्ष सचिन चिखली यांनी सांगितले की, सुमारे चार ते पाच तास चाललेल्या या संवादात शेकडो मनसैनिकांनी सहभाग घेतला. नेतृत्वाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या भेटीनंतर पक्षकार्य अधिक गतिमान होईल, तसेच प्रत्येक कार्यकर्ता नव्या जोमाने संघटनात्मक कामात सहभागी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, अमित ठाकरे यांनी पिंपरी-चिंचवडकरांच्या प्रश्नांसाठी सातत्याने शहरात उपस्थित राहणार असल्याचे स्पष्ट केले. नागरिकांच्या समस्या शासनदरबारी प्रभावीपणे मांडण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले. त्यांनी शहरातील पत्रकारांशीही संवाद साधत स्थानिक प्रश्नांवर चर्चा केली. अमित ठाकरे यांची पुणे जिल्हा संपर्क प्रमुखपदी नियुक्ती झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरात पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात पक्षबांधणीला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला हेवा वाटेल असे स्मारक उभारू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी येथे उभारण्यात येत असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्प शहरातील आंबेडकरी जनतेच्या तब्बल २२ वर्षांच्या संघर्षलढ्याचे यश आहे. हा आनंदाचा क्षण असून महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला हेवा वाटेल असे रमाई स्मारक उभारू, असे प्रतिपादन राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्पाचे भूमिपूजन उद्या २८ एप्रिलला होत आहे, या पार्श्वभूमीवर बनसोडे यांनी या स्मारकस्थळाची पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.**




यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, सह शहर अभियंता मनोज सेठीया, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता विजय जाधव यांच्यासह अधिकारी कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी बनसोडे म्हणाले, "त्यागमूर्ती माता रमाई स्मारक ही केवळ एक स्मारक नसून, आंबेडकरी चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा अध्याय आहे. या स्मारकाच्या माध्यमातून माता रमाई यांचा त्याग आणि त्यातून उभे राहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य याचे प्रभावी दर्शन नागरिकांना घडेल. हा रमाई सृष्टीचा भव्य आणि दर्जेदार प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासोबतच प्रकल्पात कोणतीही कमतरता राहू दिली जाणार नाही." माता रमाई स्मारक उभारणीमुळे शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक ओळखीमध्ये भर पडणार असून, हे स्मारक भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास यावेळी बनसोडे यांनी व्यक्त केला.

सदर पाहणीवेळी संबंधित अधिकाऱ्यांनी स्मारकाच्या नियोजित आराखड्याची माहिती सादर केली. स्मारकाचे काम नियोजनबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना अण्णा बनसोडे यांनी दिल्या.

## पिंपरीत साकारणार आधुनिक माता रमाई स्मारक सृष्टी



पिंपरी चौक येथे उभारण्यात येणाऱ्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्पासाठी २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, सुमारे २४९८.९७ चौरस मीटर क्षेत्रावर हा प्रकल्प साकारला जाणार आहे. या अंतर्गत मजबूत आरसीसी स्ट्रक्चर, आकर्षक म्युरल्स, जीआरसी काम, पुतळ्यासाठी सुबक चौथरा व प्रतीक्षालय उभारण्यात येणार आहे. परिसरात प्रवेश कमान, पादचारी मार्ग, लँडस्केप गार्डन, कारंजे व आधुनिक रोषणाईची व्यवस्था केली जाणार आहे. नागरिकांसाठी स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी रॅम्प व लिफ्ट तसेच बसण्याची सुविधा उपलब्ध असेल. यासोबतच क्युआर कोड व बहुभाषिक ऑडिओ प्रणालीसारख्या डिजिटल सुविधांमुळे नागरिकांना माता रमाई यांच्या जीवनकार्याची माहिती अधिक प्रभावीपणे अनुभवता येणार आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046